पुढारी

# राज्यात लवकरच कृत्रिम बुद्धिमत्ता विद्यापीठ

## मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन तंत्रज्ञान व इंटरनेट ऑथ थिंग्ज या नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून समाजातील शेवटच्या माणसाचे जीवनमान बदलण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. यासाठी मुंबई विद्यापीठ व वाधवानी फौंडेशनच्या सहकार्याने कृत्रिम बुद्धिमत्ता विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी केली.

राज्य सरकारच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स चॅलेंज २०१९ च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. शेतीच्या क्षेत्रात स्थिरता येण्याची गरज असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. येत्या तीन वर्षांत कृषी क्षेत्रात शाश्वतता निर्माण करून विकासाचे ध्येय साधण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता व तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यात येणार आहे. आज व्यापक सामाजिक उपयोगासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला जात आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता व अन्य तंत्रज्ञानाच्या आधाराने शाश्वत विकास साधता येतो. यामुळे राज्य सरकारने असे बदल हे कायमच स्वीकारले असल्याचे त्यांनी सांगितले.




**आर्टिफिशियल इंटेलिजन्स चॅलेंज २०१९ च्या उद्घाटन कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अन्य मान्यवर.**

तंत्रज्ञानाचा उपयोग करून हवामानातील बदल, कीटकनाशकांचा वापर, मातीचे आरोग्य, विविध कृषीविषयक बाबींचे अद्ययावत ज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविले जात आहे. स्कायमेट, अॅग्रीटेक उपक्रम राबविले जात आहेत. शेतकऱ्यांना बाजाराची अद्ययावत माहिती उपलब्ध झाल्यास त्यांना उत्पादनांचे नियोजन करणे व त्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे ठरविल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

Kolhapur Edition
3 Mar, 2019 Page No. 8
Powered by : erelego.com

# स्वातंत्र्य चळवळीत डॉ. बापूजी साळुंखे यांचे योगदान

**– प्रा. अवनिश पाटील**

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
स्वातंत्र्य हे केवळ एखाद्या राष्ट्राचे नसते. ते सामाजिक, राजनीतिक, आर्थिक, सांस्कृतिक, वैचारिकसुद्धा असते. त्यासाठी वेगवेगळ्या स्तरावर लढा द्यावा लागत असतो. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी पारतंत्र्यात स्वातंत्र्यासाठी लढा दिला, तर स्वातंत्र्यानंतर वैचारिक, सामाजिक-सांस्कृतिक जडणघडणीसाठी त्यांनी ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार या ध्येयवादाने प्रेरित होऊन विवेकानंद शिक्षण संस्थेची उभारणी केली. त्यामुळे स्वातंत्र्य चळवळीत शिक्षणमहर्षी डॉ. बापूजींचे योगदान महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे प्रा. अवनिश पाटील यांनी केले.




**कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोप समारंभात बोलताना प्रा. डॉ. अवनिश पाटील. मंचावर डॉ. एस. आर. कट्टीमनी, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, प्राचार्या शुभांगी गावडे.**

डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने विवेकानंद कॉलेज येथील इतिहास व राज्यशास्त्र विभागातर्फे आयोजित 'भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान या विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे होत्या.

प्राचार्या शुभांगी गावडे म्हणाल्या, सामान्य माणूस अभिव्याक्ति, आचार-विचार व लेखनाबरोबरच अनेक स्वातंत्र्यासाठी लढत असतो. सामान्य माणसाच्या स्वातंत्र्यासाठी डॉ. बापूजी साळुंखे अखंड लढा दिला. त्यांनी साधी राहणी व उच्च विचार हा गांधीजींचा मंत्र घेऊन समाज सुधारणा व शिक्षणाच्या प्रचार, प्रसारासाठी लढा दिला. आधुनिक भारताच्या जडणघडणीत शैक्षणिक व सामाजिक योगदान दिले. त्यांचा हा आदर्शवत समाज निर्मितीचा दृष्टिकोन समाजासाठी आजही उपयोगी आहे.

प्रारंभी स्वामी विवेकानंद, डॉ. बापूजी साळुंखे, सुशीलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. अहवालाचे वाचन डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. ज्योती चव्हाण यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. समीक्षा फराकटे यांनी केले. इतिहास विभागप्रमुख डॉ. मंजुश्री घोरपडे यांनी आभार मानले. चर्चासत्राचे संयोजन इतिहास विभागाचे डॉ. एस. आर कट्टीमनी, राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डी. ए. पवार यांनी केले. या चर्चासत्रासाठी बीजभाषक म्हणून सोलापूर विद्यापीठातील डॉ. प्रभाकर कोळेकर, गुजरात भावनगर येथील डॉ. गिरीश वाघेला, विजापूरहून डॉ. अब्दुल अजिज रजपूत, देश-विदेशातील संशोधक, प्राध्यापक, निबंधवाचक, विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ

# विद्यापीठात बुधवारी आंतरराष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग यांच्यातर्फे बुधवारी (ता. ६) एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद होत आहे. 'इमर्जिंग ट्रेंड्स अॅण्ड टेक्नॉलॉजी इन लायब्ररी अॅण्ड इन्फॉर्मेशन सायन्स' हा परिषदेचा विषय आहे. मानवशास्त्र सभागृहात परिषदेचे आयोजन केले आहे. नॅशनल केमिकल लॅबोरेटरी (पुणे) येथील ग्रंथालयाचे निवृत्त प्राचार्य डॉ. डॉ. एन. बी. दहिभाते, विजापूर येथीलल अक्कमहादेवी वुमेन्स युनिव्हर्सिटीमधील डॉ. पी. जी. तडसद, हैदराबादमधील अॅग्रिकल्चर युनिव्हर्सिटीचे डॉ. के. विरनजेनिल्यू उपस्थित राहतील. परिषदेसाठी देशभरातून ८७ संशोधन लेख मिळाले आहेत.

Kolhapur, Kolhapur-Today
03/03/2019 Page No. 1